


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २८५ ●गुरूवार,दि.१५ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

## राज्यातल्या 29 महापालिका निवडणुकांसाठी आज मतदान




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातल्या २९ महापालिका निवडणुकांसाठी आज मतदान होणार आहे. विविध ठिकाणी मतदान साहित्याचं वाटप आणि कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांवर पोहोचवण्याची तयारी सुरू आहे. राज्यातल्या २९ महापालिकांसाठी आज सकाळी साडेसात ते साडेपाच दरम्यान मतदान होणार आहे. यासाठी निवडणूक आयोगानं दिलेलं मतदार ओळखपत्र मतदारांना दाखवता येईल. याशिवाय छायाचित्र असलेली इतर १२ ओळखपत्र दाखवली तरीसुद्धा मतदान करता येईल. या ओळखपत्रांमध्ये पारपत्र, आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, सरकारी कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र, निवृत्ती वेतनाची कागदपत्र, लोकप्रतिनिधींची ओळखपत्रं, स्वातंत्र सैनिकांचं ओळखपत्र, बँक आणि टपाल खात्याचे पासबुक, दिव्यांग दाखला, मनरेगाचं जॉब कार्ड, किंवा आरोग्य विमा योजनेचं कार्ड यांचा समावेश आहे. मुंबई वगळता राज्यातल्या इतर सर्व महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग रचना आहे. बहुतांश प्रभाग हे ४ सदस्यीय असून काही प्रभाग ३ किंवा ५ सदस्यीय आहे. त्याठिकाणी मतदानांना जितक्या सदस्यांचा प्रभाग तितकी मतं द्यावी लागणार आहे. त्यांच्या ईव्हीएमवर ४ वेगवेगळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. या प्रत्येक मतपत्रिकेवर त्या त्या क्रमांकाच्या सदस्यपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची यादी आणि नोटाचे बटन असेल. मतदारांना ईव्हीएममध्ये या सर्व मतपत्रिकांच्या समोर असलेलं बटन दाबावं लागेल. मत नोंदवल्यावर ज्या उमेदवाराला मत दिलं त्याच्या समोरचा लाइट लागेल. सर्व उमेदवारांना मत दिल्यावर शेवटी बीप असा आवाज येईल आणि मतदान पूर्ण झालं याची खात्री मतदारांना मिळेल.

## महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई साहेब मुंडे यांचा मयत कै. रवींद्र बांगर कुटुंबीयास आर्थिक मदतीचा हात

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपरनई भागातील बांगर वाडा या ठिकाणी मागील आठवड्यामध्ये कैलासवासी रवींद्र काशिनाथ बांगर यांचा डोंगरामध्ये शेळ्या सांभाळत असताना एक साधे मोहोळ झाडताना मोहोळाच्या माशा चावत असल्यामुळे स्वतःच्या संरक्षणार्थ तोंडाला प्लास्टिकची पिशवी गुंडाळल्यामुळे ऑक्सिजनचा पुरवठा मिळाला नसल्यामुळे दुर्दैवी मृत्यू झाला होता. दिनांक १४ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता



महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री व बीड जिल्ह्याच्या पालक आदरणीय पंकजाताई साहेब मुंडे यांनी सदर कुटुंबास रोख स्वरूपात आर्थिक मदत डॉक्टर अभय वनवे यांच्या मार्फत पोहोच केली, कुटुंबास आधार दिला व या कुटुंबाच्या पाठीमागे उभे राहण्याचे व भविष्यातही काही अडचण निर्माण झाली तर मदत करण्याचे आश्वासन दिले. लोकनेते गोपीनाथ मुंडे अपघात विम्याच्या माध्यमातून व मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत देण्याचे अभिवचन ताई साहेब यांनी याप्रसंगी दिले.याप्रसंगी भाजपाचे वैद्यकीय आघाडीचे प्रदेशाचे उपाध्यक्ष डॉक्टर अभय वनवे उपस्थित होते. रवींद्र बांगर यांच्या पश्चात पत्नी श्रीमती सुरेखा बांगर वय २२ वर्ष व तीन वर्षांची मुलगी, दोन बहिणी आई वडील भाऊ असा परिवार आहे.

## पतंगाच्या मांजाला अडकलेल्या कावळ्याला वाचवण्यासाठी गेला अन् विजेचा झटका बसला; अग्निशमन दलाच्या जवानाचा जागीच मृत्यू



### अपुऱ्या सुविधांमुळे मृत्यू, कर्मचाऱ्यांत संताप

**या घटनेनंतर अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अपुऱ्या सुरक्षा सुविधा, संरक्षणात्मक साधनांचा अभाव आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणावर कर्मचाऱ्यांनी रोष व्यक्त केला आहे. या दुर्घटनेमुळे संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त होत असून, दोषींवर कारवाईची मागणी केली जात आहे.**

**ठाणे । प्रतिनिधी**

मकरसंक्रांतीच्या दिवशी भिवंडीत एक हृदयद्रावक दुर्घटना घडली. भादवड टेमघर परिसरात पतंगाच्या मांजाला अडकलेल्या कावळ्याची सुटका करताना विजेचा झटका बसल्याने अग्निशमन जवानाचा जागीच मृत्यू झाला. नितीन पष्टे (वय ५०) असं मृत झालेल्या जवानाचं नाव आहे. तर आसाराम आघाव हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे आणि अपुऱ्या सोई-सुविधांमुळे आमच्या सहकाऱ्याचा जीव गेला असं सांगत अग्निशमन दलाचे जवान संतप्त झाल्याचं दिसून आलं. पतंगाच्या मांजाला अडकलेल्या कावळ्याला वाचवण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले होते. रेस्क्यू ऑपरेशनदरम्यान फायबर एक्सटेन्शन पाईपचा वापर करून कावळ्याची सुटका सुरू असतानाच अग्निशमन दलाच्या जवानाचा झाडाच्या वरून गेलेल्या उच्चदाब वीजवाहिनीचा संपर्क झाला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला. एका कर्मचाऱ्याने तक्रार करताना सांगितलं की, आमच्याकडे १६ गाड्या आहेत, पण फक्त चारच कर्मचारी आहेत. राजेश पवार हे अधिकारी मनमानी करत आहेत, पैसे खात आहेत. आज जी घटना घडली याला राजेश पवार हे जबाबदार आहेत. दुसरा एक कर्मचारी म्हणाला की, भिवंडी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना फायर ब्रिगेडमध्ये बदली काम करावं लागतं. वाहन चालकाचं काम करताना रिलिव्ह करण्यासाठी दुसरे कर्मचारी नाहीत. आधी ८ तासांचे काम होते आता ते १२ तासांचे करण्यात आलं. आमच्या ज्या मागण्या आहेत त्या शासनापर्यंत पोहोचू दिल्या जात नाहीत, अधिकारी त्या तिथल्या तिथेच दाबून ठेवतात. जवानांना देण्यात येणाऱ्या कोणत्याही साहित्याचे टेस्टिंग करून दिलं जात नाही. त्यावर आमचा जीव अवलंबून असतो, आमच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो असं एका कर्मचाऱ्याने डोळ्यात पाणी आणत सांगितलं.

## बीड जिल्ह्यात अवैध वाळूची वाहतूक करणारी २ वाहने जप्त

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील महसूल खात्याच्या पथकाने अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर कारवाई केली. ही कारवाई उमरद जांघिर फाटा येथे करण्यात आली. गोपनीय माहितीवरून पथकाने गस्त घातली. यावेळी सिरस पारगावकडून बीडकडे जाणारा विना नंबरचा हायवा आढळून आला. त्यात अंदाजे पाच ब्रास वाळू होती.वाळू ही गेवराई तालुक्यातील म्हाळसपिंपळगाव येथून आणल्याचे त्याने सांगितले. हायवा ताब्यात घेऊन तहसील कार्यालयात जमा करण्यात आला.दुसऱ्या एका घटनेत महसूल खात्याचा अधिकाऱ्यांनी अहेर चिंचोली येथे कारवाई केली. यावेळी विना नंबरचे न्यू हॉलंड कंपनीचे ट्रॅक्टर एक ब्रास वाळू वाहतूक करताना पकडले. ट्रॅक्टर तहसील कार्यालयात जमा करण्यात आले. ट्रॅक्टरचे मालक कामराज पवळ, रा. अहेर चिंचोली असल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही वाहनांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दंडात्मक कारवाई होणार आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## अंकुश नगर हत्या प्रकरण; हत्येचं चक्रावणार कारण समोर

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील अंकुशनगर भागात नगरपालिका कंत्राटी कर्मचारी हर्षद शिंदे वय-३८ वर्षे याची हत्या करण्यात आली होती. पोलिसांना या हत्त्ये मागच्या कारणाचा शोध घेण्यात यश आले आहे. आरोपी विशाल सूर्यवंशी आता पोलिस कोठडीत आहे. या घटनेमागचं कारण ऐकून पोलिसही चक्रावून गेले आहेत. लहानपणी झालेल्या वादाचा बदला घेण्यासाठी आपण हर्षदचा काटा काढल्याची कबुली आरोपीनं दिली आहे.

अंकुशनगर भागात हर्षद शिंदेची मंगळवारी (६ जानेवारी) रोजी विशाल सूर्यवंशी या तरुणाने निर्घृण हत्या केली होती. भरदुपारी



घडलेल्या या घटनेमुळे खळबळ उडाल्यानंतर आरोपी विशाल सूर्यवंशी याला शिवाजीनगर व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून रविवारी (११ जानेवारी) ताब्यात घेतले. आरोपीला कोर्टात हजर केल्यानंतर त्याला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पोलिस तपासातून हर्षद शिंदेच्या हत्याकांडामागचे खरे कारण समोर आले आहे. लहानपणीच्या भांडणांचा राग मनात साठल्यामुळे आपण हे कृत्य केल्याची कबुली आरोपीने पोलिसांना दिली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी दिली आहे.विशाल सूर्यवंशीने हर्षदला जीवे मारण्यामागे लहानपणीचे भांडणे कारणीभूत असल्याचे सांगितले आहे. लहानपणीच्या भांडणाचा राग मनात ठेवून तब्बल १५ ते २० वर्षानंतर त्याचा बदला घेण्यासाठी आरोपीने एवढे टोकाचे पाऊल उचलल्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येते.हर्षदला घरासमोर काम करताना पाहिल्यानंतर त्याला बालपणीच्या भांडणाची आठवण झाली.

## गोरक्षनाथ टेकडी येथे 'गर्भागिरी प्रदक्षणा' संपन्न

### ●शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे भव्य पालखी सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांनी सुरू केलेल्या गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य महंत शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या भव्य दिव्य पालखी सोहळ्याने गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा सुरू करण्यात आली दरवर्षी पौष वद्य एकादशी श्री क्षेत्र त्रिंबकेश्वर येथे संत निवृत्तीनाथ महाराज यांची ब्रम्हगिरी पर्वत प्रदक्षिणा यात्रा निघत असते ज्या भाविक भक्तांना ब्रह्मगिरी येथे प्रदक्षिणेला जाता येत नाही अशा भाविक भक्तांना शांतीब्रह्म



नवनाथ महाराजांनी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा गुरुवर्य गोरक्षनाथ महाराजांच्या सानिध्यामध्ये सुरू केलेली आहे.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या पालखी सोबत टाळ, मृदुंग , विना,ढोल ताशे, हलगी पथक, वाजवत, हरिनामाचा जयघोष करत गुरुवर्य शांती ब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्या पालखीच्या ने गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा सुरवातीला केली संत महंत टाळकरी विणेकरी वारकरी ध्वजधारी यांच्या पाठीमागे हजारो भाविक भक्त गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा मध्ये उपस्थित होते.

### ● गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणेचे अध्यात्मिक महत्त्व

**संत गहिनीनाथ महाराज यांना गुरु गोरक्षनाथ महाराज यांचा कृपाशीर्वाद होता गहिनीनाथ महाराजांनी संत निवृत्तीनाथ महाराजांना ब्रह्मगिरी पर्वत प्रदक्षिणा करत असताना अनुग्रह दिला आणि निवृत्तीनाथ महाराजांनी हा अनुग्रह संत ज्ञानेश्वर महाराज यांना दिला या उपदेशातून वारकरी संप्रदायाची स्थापना झाली आणि ज्या भाविक भक्तांना त्रिंबकेश्वर नाशिक येथे ब्रह्मगिरीची पर्वत प्रदक्षिणा करण्याकरिता जाता येत नाही अशा भक्तांना गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज गोरक्षनाथ टेकडी येते गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा सुरू केली आहे**




## डॉक्टरांना उच्च शिक्षणाचे अमिष दाखवत गंडवणारा महाठग सौरभ कुलकर्णी जेरबंद

**केज । प्रतिनिधी**

मॅनेजमेंट कोट्यातून एमडी मेडिसिन ला प्रवेश मिळवून देतो असं अमिष दाखवून वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांना कोट्यावधी रुपयांना गंडा घालणाऱ्या महाठगास उपविभागीय पोलिस अधिकारी व्यंकटराम यांच्या पथकाने कराड येथून जेरबंद केले. अशाच ठगीचे महाराष्ट्रासह गुजरात, चंदिगढ, पंजाबसह इतर राज्यात पंधरा पेक्षा जास्त गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत. आतापर्यंत सुमारे ३ कोटी ८६ लाख ६१ हजार रु. घेऊन अनेक डॉक्टरांना फसविले आहे.

सौरभ सुहास कुलकर्णी रा. नागपूर असं या लुटारू च नाव आहे. धारूर येथील फिर्यादी वैद्यकीय



अधिकारी डॉ.अविनाश रामचंद्र तोंडे हे बारामती येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांना एम डी या पदव्यूत्तर उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी एस. के. इन्युकेशन संस्था वरील फेसबुक अकाऊंटवरुन सौरभ सुहास कुलकर्णी रा. नागपुर याचे सोबत ओळख झाली.डॉ तोंडे यांना एमडी मेडीसीनसाठी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश घ्यायचा असल्याने ते सौरभ कुलकर्णी याचे संपर्कात होते. सौरभ कुलकर्णी याने मॅनेजमेंट कोट्यातून एमडी साठी इमर्जन्सी या शाखेसाठी प्रवेश हवा असे म्हण्यावरून कुलकर्णी तीन वर्षाची फिस ही ९९ लाख रु. असल्याचे सांगितले. ती फी कमी करून ६५ लाख रु मध्ये जवाहलाल नेहरू मेडिकल कॉलेज येथे डमिशन करून देण्याचे त्याने सांगितले. या साठी त्याने डॉ तोंडे यांच्याकडून ८ लाख रु घेतले. परंतु त्यांचे कोणत्याही यादीत नाव नसल्याने डॉ तोंडे यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आहे. त्यावरून त्यांनी धारूर पोलिस ठाण्यात सौरभ कुलकर्णी याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम यांनी तपास केला असता सदर आरोपी विरुद्ध महाराष्ट्र आणि राज्या बाहेर अनेक गुन्हे असल्याचे निदर्शनास आले. त्यावरुन गुन्हयाचा तपास जलद गतीने करुन आरोपीची गोपनीय, टेक्निकल नालिसिस सेल बीड व इतर माध्यमाद्वारे माहीती काढून आरोपीचा ठावठिकाणा माहीती करुन घेवून आरोपीस अटक करणे कामी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय केज येथील एक तपास पथक रवाना केले. आरोपी यास शिताफीने कराड जि. सातारा येथे आज दि.१३ जानेवारी रोजी ताब्यात घेण्यात आले आहे. सौरभ कुलकर्णी याने आता पर्यंत अनेकाना फसवून ३ कोटी ८६ लाख ६१ हजार रु. लाटले असल्याचे प्रथम दर्शनी आढळून आले आहे. यापेक्षा जास्त लोकांना त्याने फसविले असल्याचा अंदाज आहे. सदर कारवाई जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस अधीक्षक वेंकटराम, पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर, पोलिस उपनिरीक्षक अमिर ईनामदार, पोलिस नाईक अनिल मंदे आणि आरोपीला ताब्यात घेण्यासाठी त्यांना कराड येथील नागरिक महेश कुर्ले आणि अशोक कांबळे याच बरोबर महामार्ग पोलिस कर्मचारी मोहिते यांनी मदत केली.



# शीख बांधवांची अखंड लंगर सेवा



निस्वार्थ सेवा आणि एकाच देवाची उपासना सामाजिक सेवेत समुदायाचा सहभाग या सुत्रांनी समाज उभारणी करून श्री गुरू नानक देव यांनी शीख धर्माची स्थापना केली. धर्म पुढे नेताना मुगल सम्राट औरंगजेब याचा काळ आला त्यावेळी धर्माची धुरा श्री गुरू तेग बहादूर साहेब यांच्याकडे आलेली होती.

कश्मीरी पंडितांनी त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायावर तोडगा काढावा यासाठी बलिदान देण्याची तयारी श्री गुरू तेग बहादूर यांनी दाखवली व त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले. त्यामुळे मुगल सैन्याचा त्रास कमी झाला. त्यामुळे श्री गुरू तेग बहादूर यांना हिंद दी चादर म्हंटले जाते.

आपला धर्म सर्वसमावेशक अर्थात समाजातील सर्व घटकांना सामावणारा बनविण्याचे मोठे काम त्यांनी आपल्या कार्यकाळात केले. त्यांनी इ.स.१६२१ ला जन्म झालेल्या श्री गुरू तेग बहादूर यांनी १६७५ साली सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या बलिदानानंतर त्यांचे पुत्र श्री गुरू गोविंदसिंह हे दक्षिणेत आले आणि नांदेड येथे अखेरपर्यंत निवास केला. कोणतीही व्यक्ती यापुढे गुरूपदी येणार नाही तर श्री गुरू ग्रंथ साहिब हे यापुढे गुरू असे जाहिर केले. त्यानंतर एक ईश्वर अर्थात ओंकार आणि गुरू ग्रंथ साहेब याचीच पूजा शीख धर्मात होते. श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागमाचा मोठा कार्यक्रम या निमित्ताने नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ या काळात होणार आहे. याच्या आयोजनात महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला आहे. शीख समाजाची उभारणी सामुदायिक आणि निस्वार्थ सेवा कार्यावर आधारित आहे. यामध्ये लंगर सेवा, गुरूद्वारा सेवा, शिक्षण व युवा विकास तसेच आपत्तीच्या काळात मदत यांचा प्रामुख्याने समावेश आहे. लंगर सेवा खऱ्या अर्थाने वेगळ्या प्रकारची सेवा आहे. एकता, समानता योच दर्शन आपण होईल प्रत्येक व्यक्ती स्वयंसेवक होवून जेवण बनविण्यापासून ते सर्वांना मोफत देण्याचे काम होते. अगदी भांडी स्वच्छ करण्यासाठी स्वयंसेवक होण्यासाठीही सर्व जण पुढाकार घेतात. अमृतसर येथील श्री हरिमंदीर अर्थात सूवर्ण मंदीर येथे २४ तास कोणताही खंड न पडू देता ही लंगर सेवा चालते. या ठिकाणी जगभरातील शीख धर्मिय तसेच इतर धर्माचेही लाखो भाविक, पर्यटक येत असतात.
येथे कोणताही जात, धर्म याच्या पलिकडे जाण्यायेणाऱ्या प्रत्येकास ही लंगर सेवा उपलब्ध आहे. गुरूद्वारा हुजूर साहिब अर्थात नांदेड येथे गुरूद्वारा ते सुवर्ण मंदीर अशी थेट रेल्वे सेवा सुरू झालेली आहे. ही रेल्वे नांदेड स्थानकातून निघण्यापूर्वी रेल्वेतील प्रत्येक प्रवाशाला लंगर प्रसाद शीख बांधव पूरवित आहे. या रेल्वेच्या मार्गावर थेट अमृतसर पर्यंत दुपारचे तसेच रात्रीचे जेवण या स्वरूपात लंगर प्रसाद दिला जातो. असे असणारी ही भारतातील एकमेव रेल्वे आहे.

श्री गुरू तेग बहादूर यांचा ३५० वा शहिदी समारंभ याच नांदेड नगरीत होणार आहे हे इथे विशेष. **– प्रशांत दैठणकर**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार अब्दुल रहेमान इब्राहीम पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक २७.१०.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार **अब्दुल रहेमान इब्राहीम पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा अजिम अब्दुल रहेमान पठाण यांचा जन्म दिनांक ०१.०४.१९८७** रोजी झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार सायरा उस्मान पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक ०३.११.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र. ०२ नूसार अर्जदार **सायरा उस्मान पठाण रा.महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०४.०५.१९७६ रोजी महारटाकळी** येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जग्रनो२५२५ / ईऑ९९११८१)/प्र.क्र२२ / कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार जमील उस्मान पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक ०३.११.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क ०२ नूसार अर्जदार **जमील उस्मान पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०३.०६.१९७३ रोजी** महारटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकेत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५ / ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार शकील महम्मद पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक २८.१०.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार **अर्जदार शकील महम्मद पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा सलमान शकील पठाण यांचा जन्म दिनांक ०५.०१.२०१० रोजी** महारटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५ / ईऑ९९११८१)/प्र.क्र२२ कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार फजल दिलावरखॉ पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक २७.१०.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार **फजल दिलावरखॉ पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१.०१.१९७४ रोजी** महारटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२५ / ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/ कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तुस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार अब्दुल रहेमान इब्राहीम पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक २७.१०.२०१५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार **अब्दुल रहेमान इब्राहीम पठाण रा. महारटकाळी ता.गेवराई जि. बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांची मुलगी शबाना अब्दुल रहेमान पठाण रा. महारटाकळी यांचा जन्म दिनांक ३०.०५.१९८७ रोजी** झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामुळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२५ / ईऑ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तुस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार शकील महम्मद पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक ०३.११.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार **शकील महम्मद पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यानी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०५.०१.१९८२ रोजी** महारटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थी दर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक १०.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार पठाण इस्लाम आंबीर रा. महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक १०.११.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार **अर्जदार पठाण इस्लाम आंबीर रा. महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक २९.०४.१९८८ रोजी** महारटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्मनोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्मआदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जमनो२५२५/ईऑ९९११८१)/प्र.क्र.२२/ कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचाच रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी, महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तुस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार शबनीस महम्मद पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक २८.१०.२०२५**

उपरोक्त सदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क ०२ नूसार **अर्जदार शबनीस महम्मद पठाण रा. महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०२.१०.१९९९** रोजी मटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामुळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/ कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो. स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यानी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यानी अर्जिदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तुस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार सददाम बाबुलाला पठाण रा. महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक १२.११.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नुसार **–अर्जदार सददाम बाबुलाला पठाण रा. महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०५.०९.१९९७** करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्मआदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जननो२५२५ / ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक १६.१२.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,**
१ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गेवराई
२. ग्राम महसूल अधीकारी उमापूर
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. विठठल गोविंद गायकवाड रा. मारोतीचीवाडी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक ०८.१२.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनूषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार **विठठल गोविंद गायकवाड रा. मारोतीचीवाडी ता. गेवराईजि. बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक ०९.०२.१९७७ रोजी मारोतीचीवाडी** येथे झालाअसून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनूषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी उमापूर यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक २०.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,**
१ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार राजु कारभारी पठाण रा. महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक १२.११.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार **राजु कारभारी पठाण रा.महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक १५.०६.१९७२ रोजी** करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्मआदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जननो२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदासूचे स्यानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार नसरीन महम्मद पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक २८.१०.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार **नसरीन महम्मद पठाण रा.महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक १६.०६.१९९३ रोजी** महारटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामुळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक मनो२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र२२ / कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

---

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
**दिनांक ०६.११.२०२५**
**दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–**
**प्रती,** १ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चकलांबा
२. ग्राम महसूल अधीकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५ /ईऑ ९९९९८ १)/प्र.क्र २२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
**२. अर्जदार अब्दुल रहेमान इब्राहीम पठाण रा. महारटकाळी ता. गेवराई जि. बीड यांचा अर्ज दिनांक २७.१०.२०२५**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क ०२ नूसार अर्जदार **अब्दुल रहेमान इब्राहीम पठाण रा.महारटाकळी ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा मुलगा नाझीम अब्दुल रहेमान पठाण रा. महारटाकळी यांचा जन्म दिनांक ११.०१.१९८२ रोजी** झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जननो२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का **(स्वाक्षरीत)**
**तालुका दंडाधिकारी, गेवराई**

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. १५ जानेवारी २०२६ ● पान ४



*तिळगुळ घ्या! गोड गोड बोला!! म्हणत महीला भगिनींनी मकरसंक्रांतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. (छाया आराध्या नरनाळे.)*

# आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेस सामोरे जा... यश मिळतेच: पो.अ. नवनीत कॉवत

## जयभवानी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन



**पाटोदा । प्रतिनिधी**

आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेस सामोरे जा ! यश मिळतेच !असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे दबंग कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक मा.श्री.नवनीत कॉवत साहेब यांनी केले.ते पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या करिअर कट्टा अंतर्गत मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उदघाटन सोहळ्यात प्रमुख उदघाटक म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की ग्राणीण भागातील विद्यार्थी एकदा अपयश आले की खचुन जातात.अपयशाने खचुन न जाता जिद्द,परिश्रम, योग्य नियोजन करून आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेस सामोरे जा! यश नक्कीच मिळते.आपल्या स्वत:च्या बालपणापासून शैक्षणिक आठवणी सांगुन परस्थितीवर मात करून इथपर्यंत ते कसे आले हे भावनिक होऊन सांगितले. युपीएससी परीक्षेची पुर्वतयारी कशी करावी.हे सांगताना अभ्यासक्रम,नियोजन,जिद्द, चिकाठीने अभ्यास कसा करावा हे सांगितले.पोलीस प्रशासनातील सेवेचे अनुभव सांगुन,भविष्यात राष्ट्रसेवा व समाजसेवेला प्राधान्य द्यावे !अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या आनेक प्रश्नाना त्यांनी समाधानकारक उत्तरे देवुन शंकेचे निरसन केले.या उदघाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर स्वागताध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.व्यासपीठावर उच्च न्यायालय खंडपीठ छ.संभाजीनगरचे ड.तात्यासाहेब घुमरे (पवार ) यांची प्रमुख उपस्थिती होती. पोलीस अधीक्षक मा.श्री.नवनीत कॉवत साहेब यांचे आगमन होताच महाविद्यालयात स्वसंरक्षणासाठी मुलींना मोफत कराटे प्रशिक्षण दिले जाते.त्या कराटे प्रशिक्षणाचे चित्तथरारक प्रात्यक्षिक करण्यात आले.ग्रामीण भागात कराटे चे प्रशिक्षण पाहुन त्यांनी समाधान व्यक्त केले.गुणवंत शिक्षक प्रा.शिवाजीराव भोरे व गुणवंत विद्यार्थ्यांचा मा.श्री.नवनीत कॉवत यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.भव्यदिव्य फुलांच्या वर्षावात त्यांचे औक्षणकरुन स्वागत करण्यात आले.मान्यवरांच्या शुभहस्ते दिपप्रज्वल करून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन करण्यात आले.या प्रसंगी ड.तात्यासाहेब घुमरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की ग्रामीण भागातील विद्यार्थी योग्य मार्गदर्शना आभावी स्पर्धा परीक्षेकडे जात नाहीत. तेव्हा अशा मार्गदर्शन केंद्रामुळे त्यांना फायदा होईल.म्हणुन त्यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करून या केंद्राच्या कार्याला शुभेच्छा!दिल्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की.पाटोदा हा दुष्काळग्रस्त व उसतोड कामगारांचा परिसर म्हणुन ओळखला जातो.तेव्हा या परिसरातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयात हे मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्न केंद्र सुरू करत आहोत. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन केंद्राचा योग्य उपयोग करावा व स्पर्धा परीक्षेकडे वळावे. लागेल ती मदत व मार्गदर्शन करू!अशी ग्वाही दिली.या उदघाटन सोहळ्याचे बहारदार संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले.तर मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्लयक प्रा.डॉ.श्रीमती कल्पना घारगे यांनी व्यक्त केले.या प्रसंगी ॲड.जावळे, पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक,पोलीस उपनिरीक्षक व पोलीस कर्मचारी उपस्थित होते,पत्रकार बांधव,स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी,सर्व प्राध्यापक बांधव व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व बहुसंख्य विद्यार्थी उटस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने या उदघाटन सोहळ्याचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

## राशन कार्ड उपलब्ध करून देऊ, संपर्क करा : माजी नगरसेवक सय्यद एजाज मेंबर यांनी केले आवाहन



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील तय्यब नगर, अचानक नगर परिसरातील नागरिकांना राशन कार्ड संदर्भात अडचणी निर्माण झालेल्या असून, ज्यांना राशन कार्ड नाही, अशा सर्व नागरिकांनी आमच्याशी संपर्क करावा, असे आवाहन माजी नगरसेवक सय्यद एजाज मेंबर यांनी केले आहे. गेवराई शहरातील अनेक नागरिकांना राशन कार्ड नसल्याने अनेक अडचणी निर्माण होत आहेत. सरकारी, निमसरकारी यंत्रणेकडून राशन कार्डची मागणी केली जाते. त्यासाठी, अनेक वेळा तहसील कार्यालयात चकरा मारून ही, संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी टाळाटाळ करतात. सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे, गेवराई शहरातील तय्यब नगर, अचानक नगर परिसरातील नागरिकांना अद्याप पर्यंत राशन कार्ड मिळाले नाही. ज्यांनी अर्ज दाखल करून ही, राशन कार्ड मिळाले नाही. अशा सर्व नागरिकांनी आमच्याशी संपर्क करावा. ९४२२४०६६६६ असे आवाहन माजी नगरसेवक सय्यद एजाज मेंबर यांनी केले आहे.

## एपीआय चंद्रकांत गोसावी यांना मातृ शोक !

**बीड । प्रतिनिधी**



नेकनूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांच्या मातोश्री श्रीमती शोभा गोसावी (वय ६५ वर्ष ) यांचं पश्चिम बंगालमधील कलकत्ता येथे उपचारादरम्यान निधन झालं. श्रीमती शोभा गोविंद गोसावी अतिशय धार्मिक स्वभावाच्या होत्या. हरिनाम सप्ताह असो की कुठलाही धार्मिक कार्यक्रमात त्यांची उपस्थिती आवर्जून असायचीच. चारीधाम यात्रेसाठी पश्चिम बंगालमधील गंगासागरला त्या गेल्या होत्या.या ठिकाणी सोमवारी त्यांचा अपघात झाला होता. त्यांच्यावर कलकत्ता येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. दरम्यान उपचार सुरू असतानाच सायंकाळी सात वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दि. १५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात असलेल्या विठ्ठल वाडी येथील गोसावी मळ्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, जावाई, नातवंड असा परिवार आहे.दैनिक मराठवाडा पत्र परिवार गोसावी कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयामध्ये कोटक बँकेसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

म. शि. प्र.मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्लेसमेंट विभागामार्फत कोटक बँकेसाठी दि १७ जानेवारी रोजी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे करियर गाइडन्स आणि प्लेसमेंट सेल आणि पुणे येथील ग्लोबल आऊटसोर्सिंग आणि ट्रेनिंग सर्विसेस यांच्या संयुक्त विद्यमाने खाजगी क्षेत्रातील नामवंत बँकेसाठी कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन करण्यात आले आहे. दि १७ जानेवारी २०२६ रोजी शनिवारी सकाळी १० वाजता महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये मुलाखती चे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये महाविद्यालयातून २०२२ पासून २०२६ पर्यंत कोणत्याही शाखेतून पदवी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी -विद्यार्थिनी मुलाखतीसाठी सहभागी होऊ शकतात. कॅम्पस मुलाखतीच्या अधिक माहिती करिता प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. डॉ. मोतेकर एस.सी . प्रा. उदावंत बि.डी. गणेश शहाणे यांच्याशी संपर्क साधावा. खाजगी बँकिंग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुलाखतीस उपस्थित राहून संधीचा जास्तीत जास्त लाभ करून घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के .सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन .के. मुळे ,उपप्राचार्य डॉ.प्रा. कव्हळे एम. ए., प्रा.पी .व्ही. गवते, प्रा. पी. एस .शिंदे, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांनी केले आहे.

## देवडी फाटा शाळेत जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

**वडवणी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवडी फाटा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. अतुल झाटे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विजय आगे, श्री. गितेश आगे व श्री. शेषनारायण झाटे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजनाने झाली. मुख्याध्यापक श्री. बगाडे सर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी शाळेचा माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्यात आला असून अध्यक्षपदी श्री. गितेश आगे यांची निवड करण्यात आली.

# नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांची 'पेढे तुला' करीत अक्षय भुमकर यांनी त्यांच्याबद्दल ऋण व्यक्त केले

### ● मंगळवार पेठ भागात जंगी स्वागत ; १११ किलोंची पेढे तुला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आपल्या नेत्यांविषयी किती प्रेम असावे, व ते कसे व्यक्त करावे. याचा प्रत्यय अंबाजोगाईकरांना नुकताच आला. शहराचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांची 'पेढे तुला' करीत कार्यकर्ते अक्षय भुमकर यांनी त्यांच्याबद्दल ऋण व्यक्त केले. यावेळी मंगळवार पेठ भागात जंगी स्वागताचा सोहळा आयोजित करून भुमकर यांनी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांची १११ किलोंची पेढे तुला करून आपला नवस पूर्ण केला. नंदकिशोर मुंदडा हे मागील ४० वर्षांपासून केज विधानसभा मतदारसंघासह अंबाजोगाईच्या समाजकारण आणि राजकारणातील



एक महत्त्वाचे नेते व प्रमुख नांव आहे. केज विधानसभा मतदारसंघ ज्यांना खडानखडा माहित असलेले व प्रत्येकाच्या सुखदुःखात, मदतीला धावून जाणारे, अहोरात्र जनसेवेसाठी कार्यरत असलेले, प्रचंड जनसंपर्क असलेले, किंगमेकर नेते अशी नंदकिशोर मुंदडा यांची सर्वदूर ओळख आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत श्री. मुंदडा यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून अंबाजोगाईकरांनी त्यांना भरभरून मतदानरूपी आशीर्वाद देवून नगराध्यक्षपदी विराजमान केले. श्री. मुंदडा यांना केज विधानसभा मतदारसंघात काकाजी या नांवाने लहान, थोर सर्वजण संबोधतात. आपल्या घरातील ज्येष्ठ, आदरणीय व्यक्ती म्हणून ही त्यांच्या कार्याविषयी नेहमीच आदरभाव व्यक्त केला जातो.


## परिशिष्ट -4

अवसायक (खालील तपशिला प्रमाणे)
संलग्न, सहायक निबंधक, सहकारी संस्था
ता. शिरुर का., जि.बीड
दि.13/01/2026

मा.सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.शिरुर कासार,जि. बीड यांनी त्यांचे कार्यालयीन आदेशाव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चेकलम 102 मधील तरतूदीन्वये खालील सहकारी संस्थेचे अंतिमआदेश निर्गमित केलेले असून त्यावर खालील तपशिलाप्रमाणे अवसायकांची नियुक्ती केलेली आहे. त्यानुषंगाने खालील सहकारी संस्थांची अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम 1961 मधील नियम 89 (4) मधील तरतूदीप्रमाणे खालील सहकारी संस्थांच्या सर्व संबधीतांना याव्दारेनोटीस देऊन कळविण्यात येते की, त्यांना संस्थेस देणे असल्यास अथवा संस्थेचे येणे असल्यास या नोटीसचे दिनांकापासून **दोन (02)** महीन्याच्या आत त्यांचे येणे रक्कमेबाबत हरकती / आक्षेप पुराव्यानिशी संबधीत अवसायकाकडे दाखल करावे, आणि देणे रक्कम तात्काळ संबधीत अवसायकाकडे जमाकराव्यात वरील मूदतीत संस्थेचे देणे / येणे रक्कमांचे अनुषंगाने संबधीत अवसायकाकडे पुराव्यानिशी कागदपत्रे दाखल न केल्यास संस्थेस कोणाचे ही देणे नाही अथवा येणे नाही असे समजण्यात येऊन अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल तसेच संस्थेच्या येणे असलेल्या रक्कमासंबधीत अवसायकाडे जमा न केल्यास त्याकायदयातील तरतूदीप्रमाणे वसूल करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. मूदतीनंतर आलेल्या आक्षेपावर विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अवसायकाचे नाव | अवसायनाचा अंतिम आदेश दिनांक | घेण्यात येणा-या अंतिम सभेचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | मेघराजजी बोथरा ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.शिरुर का.,ता.शिरुर(का.)जि.बीड | श्री.पी.आर.आगे | 27.03.24 | 24.03.2026 |
| 2 | नागनाथ ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था म.मानुर ता.शिरुर(का.)जि.बीड | श्री.पी.आर.आगे | 27.03.24 | 25.03.2026 |
| 3 | आदर्श ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था म.रायमोह, ता.शिरुर(का.)जि.बीड | श्री.ए.बी.कांबळे | 27.03.24 | 24.03.2026 |
| 4 | जयभवानी सुशिक्षीत बेरोजगार कामगार सेवा सहकारी संस्था, म.ता.शिरुर(का.)जि.बीड | श्री.ए.बी.कांबळे | 31.3.2025 | 25.03.2026 |

तसेच वरील संस्थांच्या सर्व सभासद धनको, ऋणको यांना याव्दारे असे ही सूचित करण्यात येते की, संस्थेची अवसायन कामकाजाची कार्यवाहीपूर्ण करण्याच्या दृष्टीकोणातून अंतिम सभा वर नमुद केलेल्या दिनांकास सकाळी ठिक 11.00 वाजेपासून सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.शिरुर का.,इंद्रायणी इमारात, राक्षसभुवन रोड,शिरुर का, जि.बीड यांचे कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे. सदर सभे ससंस्थांच्या सर्व सभासद, धनको, ऋणको, यांनी त्यांचे आक्षेप व पुराव्यासह हजर राहावे. सदर सभेमध्ये अवसायन कामकाजाचा अहवाल व संस्थानोंदणी रद्दकरणे बाबतचा विचार विनिमय केला जाणार आहे यांची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

(ए.बी.कांबळे)
मुख्य लिपीक,
संलग्न सहायक निबंधक,
सहकारी संस्था,शिरुर का.जि.बीड

(पी.आर.आगे)
सहकार अधिकारी श्रे-2
संलग्न सहायक निबंधक,
सहकारी संस्था,शिरुर का.जि.बीड

(आर.एम.मोटे)
सहायक निबंधक,
सहकारी संस्था,शिरुर का.जि.बीड



## परिशिष्ट -4

अवसायक (खालील तपशिलाप्रमाणे)
संलग्न, सहायक निबंधक, सहकारी संस्था
ता. आष्टी, जि.बीड
दि.13/01/2026.

मा.सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. आष्टी, जि.बीड यांनी त्यांचे कार्यालयीन आदेशाव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चेकलम 102 मधील तरतूदीन्वये खालील सहकारी संस्थेचे अंतिम आदेश निर्गमित केलेले असून त्यावर खालील तपशिलाप्रमाणे अवसायकांची नियुक्ती केलेली आहे. त्यानुषंगाने खालील सहकारी संस्थांची अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम 1961 मधील नियम 89 (4) मधील तरतूदी प्रमाणे खालील सहकारी संस्थांच्या सर्व संबधीतांना याव्दारे नोटीस देऊन कळविण्यात येते की, त्यांना संस्थेस देणे असल्यास अथवा संस्थेचे येणे असल्यास या नोटीसचे दिनांकापासून **दोन (02)** महीन्याच्या आत त्यांचे येणे रक्कमेबाबत हरकती / आक्षेप पुराव्यानिशी संबधीत अवसायकाकडे दाखल करावे, आणि देणे रक्कम तात्काळ संबधीत अवसायकाकडे जमा कराव्यात वरील मूदतीत संस्थेचे देणे / येणे रक्कमांचे अनुषंगाने संबधीत अवसायकाकडे पुराव्यानिशी कागदपत्रे दाखल न केल्यास संस्थेस कोणचेही देणे नाही अथवा येणे नाही असे समजण्यात येऊन अवसायन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल तसेच संस्थेच्या येणे असलेल्या रक्कमासंबधीत अवसायकाडे जमा न केल्यास त्या कायदयातील तरतूदीप्रमाणे वसूल करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. मूदतीनंतर आलेल्या आक्षेपावर विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अवसायकाचे नाव | अवसायनाचा अंतिम आदेश दिनांक | घेण्यात येणा-या अंतिम सभेचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1. | स्व.महावीर मेहेर ग्रा बि.शे म.कडा . | एस के आजबे प्र ले प | 1/3/2014 | 23/03/2026 |
| 2. | श्रीधर गुंड ग्रा . म.शे.बि.धानोरा | एस के आजबे प्र ले प | 10/10/2014 | 24/03/2026 |
| 3. | स्व विठठलराव जगताप महिला ग्रा. बि. सह. पत. मर्या कानडी खु. | बी. एम. राऊत मु. लि. | 7/3/2025 | 23/03/2026 |
| 4. | एलिफ ग्रीन नागरी सह पत म आष्टी | बी डी.फलके सअ श्रे.-1 | 7/3/2025 | 24/03/2026 |
| 5. | सौ .म.सं.केशरबाई जिनींग प्रेसिंग सह. केरूळ | बी. एम. राऊत मु. लि. | 17/10/2023 | 23/03/2026 |
| 6. | बहुउद्देशीय ग्रामीण कारागीरांची औद्यो सह संस्था म आष्टी | मुटकुळे बी एन बँक तपासणीस | 7/3/2025 | 24/03/2026 |
| 7. | वैष्णवी महिला मागास औद्यो सह सं म. वटनवाडी | बी डी.फलके सअ श्रे.-1 | 7/3/2025 | 23/03/2026 |
| 8. | जयमल्हार मागास बहुउद्देशीय औद्यो सह सं म कडा | बी डी.फलके सअ श्रे.-1 | 7/3/2025 | 24/03/2026 |
| 9. | ओमगुरूदेव गृहनिर्माण सह .संस्था म . आष्टी | बी. एम. राऊत मु. लि. | 25/01/2016 | 23/03/2026 |
| 10. | स्वामी विवेकानंद सर्व सह सं म डोंगरगण | बी डी.फलके सअ श्रे.-1 | 7/3/2025 | 24/03/2026 |
| 11. | गणेशमजूर सहपांढरी .संस्था म . | बी डी.फलके सअ श्रे.-1 | 25/01/2016 | 23/03/2026 |

तसेच वरील संस्थांच्या सर्व सभासद धनको, ऋणको यांना या व्दारे असेही सूचित करण्यात येते की, संस्थेची अवसायन कामकाजाची कार्यवाही पूर्ण करण्याच्या दृष्टीकोणातून अंतिम सभा वर नमुद केलेल्या दिनांकास सकाळी ठिक 11.00 पासून सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.आष्टी, जि.बीडयेथेठेवण्यातआलेलीआहे. सदरसभेससंस्थांच्यासर्वसभासद, धनको, ऋणको, यांनी त्यांचे आक्षेप व पुराव्यास हजर राहावे. सदर सभे मध्ये अवसायन कामकाजाचा अहवालव संस्था नोंदणी रद्द करणेबाबतचा विचारविनिमय केला जाणार आहे यांची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

( बी.डी. फलके)
सहकार अधिकारी श्रेणी-1,
संलग्नस.नि,सह.संस्था,
ता.आष्टी,जि. बीड

(डी.वाय. पवळ)
सहायक निबंधक,
संलग्नस.नि,सह.संस्था,
ता.आष्टी,जि. बीड